ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगातून प्रकट झालेला जीवनानुभव

**प्रा. राजकुमार नागनाथ नवले**
**पदव्युत्तर विभाग, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. ज्ञानदेवांनी पाया रचला, तुकारामांना कळसाचे भाग्य लाभले तर मुक्ताबाईनी ध्वज फडकावला. आपल्याला लाभलेल्या अत्यल्प आयुष्यामध्ये ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी व हरिपाठाचे अभंग हे चारही ग्रंथ त्यांनी लिहिले. त्यातील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी. या ग्रंथाचे मूळ नाव " भावार्थ दीपिका " असे आहे. पण हा ग्रंथ " ज्ञानेश्वरी " या नावानेच प्रसिध्द आहे. ज्ञानेश्वरी म्हणजे गीतेवरील मराठी भाष्य होय. परंतु हे भाष्य करताना ज्ञानेश्वरांनी त्यातील तत्वज्ञाना इतकेच वाङ्मय दृष्टीनेही अत्यंत सरस व सौंदर्यपूर्ण असा आहे. आंधळया भक्तीपेक्षा त्यांना डोळस भक्ती प्रिय होती.



संत ज्ञानेश्वर यांनी सर्व मानवी व्यवहाराला शुध्द व उदात्त बनविण्याचे कार्य धर्मामुळे घडून येते हे लक्षात घेऊन ज्ञानेश्वरांनी धर्मनिष्ठा प्रज्वलित करण्याचे कार्य केले. हिंदूचे त्यांनी इस्लामीकरण होऊ दिले नाही. हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य होते. ज्ञानेश्वरांनी सामान्यजनांना आपल्या अभंगातून कोणता उपदेश केला ? त्यांनी कोणत्या जाणीवा निर्माण केल्या ? त्यांना त्यांच्या अभंगातून काय सांगायचे आहे ? त्यांनी हेच विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी अभंगाची रचना केली.

मी हा विषय का निवडला ? याचे कारण ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगाद्वारे जो विचार मांडला आहे तो आजच्या तरुन पिढीपर्यंत त्याचा विस्तार व्हावा तसेच ज्ञानेश्वरांच्या विठ्ठलावरील अपार भक्ती, प्रेम, उपदेश, विचार आपल्या अभंगातून सांगितलेले आहे. त्यांनी लोकांच्या कल्याणसाठी जो प्रयत्न केला ते तुमच्या पर्यंत पोहचवण्यासाठी मी हा विषय निवडला आहे.

**ज्ञानेश्वरांची जीवनप्रणाली :**

तेराव्या शतकापासून म्हणजे सुमारे सातशे वर्षापासून ज्ञानेश्वरांची अमृतवाणी मराठी मनाला मोहिनी घालत आहे. आजही, अगदी एकविसाव्या शतकाकडे वाटचाल सुरु असताना तिच्या कोवळीकीला कोठे बाधा आलेली नाही. आजही घरोघरी ज्ञानेश्वरीचे पारायण करण्याची प्रथा परंपरेने चालू आहे. " ज्ञानेश्वर माऊली " चा नामघोष सतत ऐकू येतो. अशा ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स. १२७५ मध्ये झाला. ज्ञानेश्वरांवचे वडील विठ्ठलपंत हे आपेगाव येथील कुलकर्णी होते. त्यांच्या आईचे नाव रुखमिणी होय. त्यांच्या भावंडाची नावे निवृत्ती, सोपानदेव व मुक्ताबाई असे होते. असे हे सहा माणसांचे सुखी कुटुंब होते.

विठ्ठलपंथांना संन्यास घ्यावसा वाटल्यामुळे त्यांनी गृहस्थाश्रम सोडून त्यांनी संन्यासधर्म स्विकारला. परंतु पुढे त्यांनी आपल्या गुरुच्या सांगण्यावरुन पुन्हा गृहस्थाश्रम स्विकारला. मात्र या मुलांना संन्याशाची मुले म्हणून बालवयापासून लोकनिंदा व बहिष्कार यांना तोंड द्यावे लागले. दारिद्र, दुःख व बहिष्कार हयांनी होरपळलेले विठ्ठलपंत अखेरीस ब्राम्हणास शरण गोले. त्यांची क्षमा मागितली, प्रायश्चित्ताची तयारी दर्शवली.

ज्ञानेश्वरांची अलौकिक योग सामर्थ्य यांची ग्रंथरचना यामुळे त्यांची किर्ती साऱ्या महाराष्ट्रात पसरली होती. निवृत्तीनाथ हे सगळया भावंडात जेष्ठ ते तपस्येच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वरी गेले असता त्यांना साक्षात गहिनीनाथांनी दर्शन देऊन कृतार्थ केले. निवृत्तीनाथांनी हीच नाथपंथाची दीक्षा ज्ञानेश्वरांना दिली. ज्ञानेश्वरांनी पुढे हा वारसा सोपान व मुक्ताबाई हयांना दिला. संत मंडळात त्यांचे वय लहान असून अग्रस्थान मिळाले.ज्ञानेश्ववरांनी गुरुच्या आज्ञेने इ.स. १२९६ रोजी

आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. ज्ञानेश्वरांनी अनेक प्रकारची अभंगरचना केली आहे. त्यांनी विपुल अशी ओवी रचना केली. त्यांनी लिहिलेल्या अभंगवाणीमधील अभंगाची संख्या १००० इतकी आहे. त्यांनी अनेक प्रकारचे अभंग लिहिले ते पुढील प्रमाणे .....

## संत ज्ञानेश्वरांचे रुपकात्मक अभंग :

एखादी अवघड वाटणारी गोष्ट सोपी करुन सांगण्यासाठी रुपकाचा आधार घेतला जातो. माणसंना सरळ कोणी उपदेश केला तर तो आवडत नाही ... पण रुपक आणि दृष्टांतांच्या आधारे केलेला उपदेश मात्र चट्कन समजता. ज्ञानेश्वरांनी रुपकांचा आश्रय घेऊन आपल्या तत्त्वज्ञानाच्या निरुपणासाठी विविध प्रकारची रचना केली आहे. ही रुपके जीवनातील सामान्य अनुभवावर आधारलेली आहे.

रात्री दिवस वाहतसे चिंता। केशव घडौता होईन मी।।
खिरजट घोंगडे फाटके ते कसे। विचिले कैसे भोगिजेगा।।
वित्त नाही गाठी जीविला आटी। उघडी पाठी हीव वाजे।।
घोंगडे देईल तो एकदाता। रखुमादेवीवरा मागे रे आता।।

परमेश्वर आपल्यावर कृपेची घोंगडी पांघरतो, त्यामुळे आपल्या सर्व व्यथा-व्याधी दूर पळतात हा विचार मध्यवर्ती ठेवून " घोंगडी " ची रचना केली आहे. आपले विस्कटलेले मन विविध विकारांनी त्रस्त झालेले मन म्हणजेच सध्या आपल्याकडे असलेली घोंगडी अशावेळी परमेश्वराने नवी घोंगडी पांघरुन आपले संरक्षण करावे मी तुझ्यापासून दूर असलो तरी तुझ्या कृपासृष्टीचा मला लाभ मिळावा. तसेच लहान मुलींच्या फुगडी या खेळावरील रुपक त्यांनी मांडले. सगळया विकारांच्या पलिकडे जाऊन हरीपाशी एकरुप होणे आपण संसाराची फुगडी घालून निब्रम्हाला जागवून ब्रम्हाशी एकरुप होऊ " फुगडी या खेळाचा आधार घेऊन ज्ञानेश्वर म्हणतात

फुगडी फू गे बाई फुगडी फू। निजब्रम्हा तू गे बाई परब्रम्ह तू गे ।।
मन चित्त धू । विषयावरी थू । एक नाम मांडी। दुजा भाव सांडी।।
हरि आला रंगी। सज्जनाचे संगी। ज्ञानदेवा गोडी केला संसार फुगडी।।

ज्ञानेश्वराच्या अश्या प्रकारच्या रुपकात्मक प्रतिभेचा विलास पाहून मन आश्चर्यचकित होते तसेच त्यांची विठ्ठलावर अपार भक्ती होती ती भक्ती त्यांच्या काही भक्तिपर अभंगातून प्रकट होते ती पुढीलप्रमाणे इ

## ज्ञानेश्वरांचे गुरुगौरवपर अभंग

अगदी प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत सद्गुरुचे स्थान आणि महात्म सर्वांनीच मान्य केले आहे. भारतीय गुरुपरंपरा ही प्राचीन काळापासून चालत आलेली पवित्र अशी परंपरा आहे. कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात योग्य वेळी योग्य गुरु भेटणे हे अत्यंत महत्वाचे असते. गुरुंच्या योग्य अशा मार्गदर्शनामुळे शिष्याची प्रगती होत असते. आईवडील अपत्यांना जन्म देतात. पण ख-या अर्थाने त्या अपत्याला घडविण्याचे कार्य गुरु करीत असतात. सर्वार्थाने समर्थ बनवितात.

ज्ञानेश्वरांनी फार सुंदर अशी गुरुंचे महात्म्य वर्णिले आहे. ते असे-

सद्गुरुसारिखा सोयरा सज्जना। दाविले निधान वैकुंठिचे।।
सद्गुरु माझा जीवाचा जीवलग। फेडियला पांग प्रपंचाचा।।
सद्गुरु हा अनाथ माऊली। कृपेची साऊली केली मजा।।
ज्ञानदेव म्हणे अवचित घडले। निवृत्तीने दिधले निजबीज।।

याचा भावार्थ असा की, 'श्री सद्गुरुंची आमच्यावर प्रचंड कृपा आहे व ते आम्हाला आपले जीवलग समजतात व म्हणूनच त्यांनी आम्हाला प्रत्यक्ष वैकुंठाच्या स्वामीचे दर्शन घडविले. सद्गुरु हे अनाथांची त्यांनी माझ्यावर त्यांच्या कृपेची सावली धरली आहे. त्यांच्या कृपेनेच मला त्यांची प्राप्ती झाली आहे. गुरु महात्म्याचे वर्णन करणारा अन् गुरुविषयी नितांत आदरभाव व्यक्त करणारा एक सुंदर असा अभंग ज्ञानदेवांनी रचला आहे. त्यात ते म्हणतात गुरु हा संतकुलीचा राजा। गुरु

हा प्राणविसावा माझा। गुरु हा सुखाचा सागरु। गुरु हा प्रेमाचा आगरु। गुरु हा धैर्याचा डोंगरु। गुरु वैराग्याचे मूळ। गुरु हा भक्तालागी माय। शिष्यांच्या डोळयात ज्ञानाचे अंजन घालून त्यांना शहाणे करुन सोडणोर गुरु हे परमेश्वराचे रुप आहे.

## ज्ञानेश्वरांचे भक्तिपर अभंग :

ज्ञानेश्वरांच्या अभंगातून साक्षात्काराची अनुभूती प्राय: सगुण भक्तीच्या माध्यमातून आवतरताना दिसते. सुगंध सूत्राने गुंफता येत नाही. मोत्यांच्या कांतीने रांजण भरता सेत नाही. अगदी तसेच विठ्ठल आणि रुक्मिणी यांना एकमेकापासून वेगळं करता येत नाही. विठ्ठल म्हणजे ज्ञानमात्र मित्र आणि रुक्मिणी म्हणजे त्यांचा विलास ते दोघे भांडत असले तरी ती त्यांची क्रिडा आहे. त्यांचा हा प्रीतीकलह आहे. तो त्यांच्यात विलीन झालेला असतो. ज्ञानेश्वर सांगतात इ

विठ्ठल रखुमाईचे भांडण। कोण करी बुझावणी।
तया विठ्ठलचरणी। ज्ञानदेवो।।

ज्ञानेश्वरांच्या अभंगगाथेत सगुण भक्तीच्या माध्यमातून रसोत्कट ब्रम्हादर्शने सहजतेने येऊ न गेली आहे. विठ्ठल मूर्ती पाहता पाहता यातून जगदीश्वर भेटल्याचा आनंद त्यांना होतो. एका अभंगात त्यांनी आपल्याला झालेला आनंद व्यक्त केला.

ऐसा जगजीवनु जगावला। जगमूर्ति देखिला।
तो जगदिश्वर फळला। निरंजनी वो माये।।
भक्तीपरी निडारला। निजानंदु घनावला।।
रखुमादेवीवरु स्थिरावला। ह्वदयी वो माये।।

ज्ञानेश्वर येथे निर्गुण निराकाराला सगुण साकार रुपात उभे करतात आणि हे सगुण-साकार रुप पाहता त्यांचे ह्वदय भरुन येते. ज्ञानेश्वरांनी आपल्या अनेक अभंगातून त्यांची विठ्ठलभक्ती व्यक्त केली आहे. ते विठ्ठलाच्या भक्तीत इतके रमून गेले आहे की सर्वत्र त्यांना त्यांचे रुप भाऊन घेतले आहे. त्यांच्या मनी ध्यानी भक्त विठ्ठलाचीच मूर्ती होती असे या अभंगातून प्रकट होते. त्यांनी पंढरीवर महात्म सांगणारेही काही अभंग रचले आहे ते पुढीलप्रमाणे-

## ज्ञानेश्वरांचे पंढरपूर महात्म सांगणारे अभंग

ज्ञानेश्वरांनी संतांनी व समस्त वारकरी संप्रदायाने सावळा विठ्ठल हा श्रीकृष्ण समजून त्याला कृष्णाच्या रुपातच पाहिले. भगवंताचे सगुण रुप म्हणजे विठ्ठल ! प्रत्यक्ष परमेश्वरच विठ्ठलाच्या रुपात या भूमीवर उतरला आहे. ज्ञानेश्वरांनी पंढरपूरचे महात्म सांगणारे अभंग त्यांनी रचले आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगातून या विठ्ठलाचे सगुण रुपात परमेश्वराचे सुंदर असे चित्र रेखाटले आहे.

ज्ञानेश्वर विठ्ठल आणि माणव ही रुपे एकच मानतात. एका अभंगात ते म्हणतात-

रुप पाहता लोचनी। सुख झाले हो सजणी।।
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माण्धव बरवा।।
बहुता सुकृताची जोडी। म्हणूनि विठ्ठल आवडी।।
सर्व सुखाचे आगर। बाप रखुमादेवीवर।।

वरील अभंगात ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाचे रुपाचे हुबेहुब दर्शन घडविले आहे. विठ्ठलाच्या सावळया रुपाचे ते कौतुक करतात. श्रीकृष्ण आणि विठ्ठल ही सुकृताची जोउी आहे. दोन्ही दैवते एकाच रुपात भेटल्याने ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाचे सगुण रुप मनात साइविले आहे.ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीतून विठ्ठल प्रेमाचा झरा अखंडपणे वाहताना दिसतो. निर्गुण परमात्म्याचे सगुण रुप म्हणून ते विठ्ठलाकडे मोठया श्रद्धेने पाहतात. 'आड वाहे भीमा। तारावया देह आत्मा।' असे भीमा नदीचे महात्म्य सांगून या भीवरेच्या काठी सुदर्शन ठेवून श्रीहरीने उभे केलेल हे महाक्षेत्र ज्ञानेश्वराच्या लेखणीचे सौंदर्य जर कुणाला पाहावयाचे असेल तर निळया रंगाची उधळण पाहावी व अनुभवावी. ज्ञानेश्वरांनी इथे विठ्ठलाचे जे दर्शन घडविले ते पूर्णत: आगळे वेगळे अन् मनाला प्रसन्नता देणारे आहे.

अशा प्रकारे ज्ञानेश्वरांनी विठ्ठला विषयी असणारे अपार प्रेम व त्यांचे महाम्त वर्णिला आहे.

## उपदेशात्मक अभंग

अंधारात खिचपत पडलेल्या समाजाला यथायोग्य उपदेश करुन त्यांना प्रकाशाच्या वाटेवर आणण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी केले. आपल्या भागवत धर्माच्या झेंडयाखाली समसत समाजाला एकत्र करुन त्यांनी उपदेश केला आहे. आपल्याला लाभलेल्या श्रेयाचा अनुभव लोकांना देण्यासाठी ते तळमळू लागले. तेव्हापासून त्यांची अभंगवाणी उपदेशाचे बोल बोलू लागली. ते म्हणतात-

'सांडी सांडी हा खोटा चाळा।
नित्य स्मरारे गोपाळा।।'

असा अर्थ उपदेश ज्ञानेश्वर वारंवार करतात नामस्मरणाचा साधा सोपा मार्ग त्यांनी आपणाला उपलब्ध करुन दिला आहे. नामस्मरण कुणीही केव्हाही कोठेही करावे. त्यावर कोणतेच बंधन नाही. नामस्मरणाची तयारी कशाची करावी किंवा नामस्मरणासाठी कशाची गरज नसते. मनापासून आपण नामस्मरण करावे. नामामुळे पूर्वाश्रमाची सर्व पापे जळून जातात. अन् पुण्याचा मार्ग खुला होतो असा उपदेश ज्ञानेश्वर करतात. मन हे चंचल असल्याने अध्यात्माच्या मार्गावरील वाटचालीत ते नेहमीच अडथळा बनून राहते. मनात येते ते सर्वच खेर असते असे नव्हे हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात- स्वप्नात लाभलेले धन हे खरे धन नसते. अगदी तसेच चंचल मनात आलेले विचार खरे नसतात. ज्ञानेश्वरांनी

अरे मना तू पापिष्टा। किती हिंडसी रे नष्टा।।
अरे मना तू वांजटा। सदा हिंडसी कर्मण।।

माणसाचे मन मोठे विचित्र असते. विकाराकडे ते नेहमीच धावत असते. त्याला भोगाची आसक्ती असते असा उपदेश त्यांनी अभंगातून केला आहे.

## निष्कर्ष

१. ज्ञानेश्वरांच्या अभंगातून असपल्याला त्यांचे जीवनुभव मिळाले
२. त्यांची विठ्ठल भक्तीवरील भक्ती, चिंतन, स्मरण, नामस्मरण कसे होते हे कळाले.
३. त्यांच्या उपदेशाचे महत्त्व कळाले.
४. ज्ञानेश्वरांची अभंगवाणी भक्ती प्रेमातून प्रकट झालेली आहे.
५. त्यांच्या अभंगाची भाषा साधी सोपी सरळ आहे.
६. त्यांच्या अभंगात ओवीबद्दल भाषेचा समावेश आहे.
७. ज्ञानेश्वरांचे लहान वय असूनही त्यांनी संत मंडळात अग्रस्थान मिळवणारे पहिले महान संत आहेत.

## समारोप :

असे हे थोर संत ज्ञानेश्वर महाराज यांच्य जीवनकार्याचा हा थोडक्यात घेतलेला परिचय आहे. आजच्या पिढीला या संत साहित्याची फार मोठया प्रमाणावर गरज आहे. आजकाल असे वाटू लागले आहे की आपण प्रामाणिकपणे एखोद कार्य जर हाती घेतले तर त्यास यशस्वीतेची गोडी प्राप्त होते त्यासाठी योग्य संस्कारांची गरज आहे. जर सम-समान भावनांची जागृती करावयाची असेल तर संत साहित्याची अभ्यासाची जागृती आहे. थोडया प्रमाणात का होईना संस्कृतीचे संवर्णन होईल.

## संदर्भ ग्रंथ :

१. ज्ञानदेव आणि नामदेव - डॉ. श.दा.पेंडसे प्र.आ. सप्टेंबर १९६९
२. नामसाधनेचा भक्तीप्रवाह - नरेंद्र सदाशिव कुंटे सुविधा प्रकाशन प्र.आ.२००४
३. श्री ज्ञानदेवाची चांगदेव पासष्टी - डॉ. वा.पु.गिंडे मेहात पब्लिकशिंग हाऊस प्र.आ.१९९२